# मेट्रो ३ : जुळ्या बोगद्यातून टीबीएम पडली बाहेर

## नयानगर - माहीम ते दादर भुयारीकरण पूर्ण

**मुंबई :** संपूर्णतः भुयारी असलेल्या मेट्रो ३ मार्गिकेच्या कामाचा महत्त्वाचा टप्पा गुरुवारी पूर्णत्वास आला. माहीम येथील नयानगर लॉचिंग शाफ्टमधून भुयारीकरणास प्रारंभ करणाऱ्या कृष्णा १ आणि कृष्णा २ या टनेल बोअरिंग मशिन्सनी (टीबीएम) दादरपर्यंतचे भुयारीकरण यशस्वीरीत्या पूर्ण केले. एकाच दिवशी जुळ्या बोगद्यांतून दोन्ही टीबीएम मशिन्स बाहेर पडल्याने ही वैशिष्ट्यपूर्ण बाब असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनेकडून (एमएमआरसी) सांगण्यात आले आहे.



एमएमआरसीने यापूर्वी सीप्झ व आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन ठिकाणी भुयारीकरण पूर्ण केले आहे. दादर येथील शिवसेना भवनपर्यंतचा भुयारीकरणाचा टप्पा गाठण्यात गुरुवारी यश मिळाले आहे. २१ सप्टेंबर २०१७ आणि १८ ऑक्टोबर २०१७ रोजी कृष्णा १ व कृष्णा २ हे दोन्ही टीबीएम मशिन्स माहीम नयानगर येथील लॉन्चिंग शाप्ट येथून भूगर्भात उतरवण्यात आल्या होत्या. नयानगर माहीम ते दादर मेट्रो स्थानकापर्यंत अप मार्गावर २४९० मीटर भुयारीकरण करण्यासाठी दररोज १० ते १२ मीटर भुयारीकरण करण्यात आले आहे. याबाबत एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी आणखी महत्त्वाचा टप्पा गाठल्याचे समाधान व्यक्त केले. सध्या सर्व १७ टीबीएम मशिन्स मुंबईच्या भूगर्भात काम करत आहेत.आणि १८ किमीपेक्षा अधिक म्हणजेच ३५ टक्के भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे सध्या कामाची गती पाहता मुंबईकरांच्या आरामदायी प्रवासासाठी दिलेल्या वेळेत आम्ही मेट्रो ३ मुंबईकरांच्या सेवेत आणू, असा विश्वास व्यक्त केला आहे.

- कृष्णा १ टीबीएमसाठी २४९० मीटरसाठी १७७९ आरसीसी सिमेंट रिंग्जचा वापर
- कृष्णा २ टीबीएमसाठी २४७२ मीटरसाठी १७६६ आरसीसी सिमेंट रिंग्जचा वापर
- भुयारीकरणासाठी अभियांत्रिकी आणि कामगारांची १०० जणांची टीम कार्यरत
- कृष्णा १ व कृष्णा २ हे हॅरॅन्कनेट या जर्मनी बनावटीचे टीबीएम मशीन
- दोन्ही टीबीएमची लांबी १०८ मीटर प्रत्येकी ४०० टन इतक्या वजनाची नोंद